महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारसा आधारीत अनुभवात्मक पर्यटन विकसित करण

दृष्टिक्षेप

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (MTDC) पालघर आणि नाशिक जिल्ह्यातील अमूर्त सांस्कृतिक वारसावर (ICH) आधारित पर्यटनाला चालना देण्यासाठी एक अभिनव व नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. सदर उपक्रमाकरिता एमटीडीसीने "कॉन्टक्ट बेस" या संस्थेला समुदाय आधारित पर्यटन मॉडेल डिझाइन आणि विकसित करण्यासाठी नियुक्त केलेले आहे. सांस्कृतिक विकास आणि सर्वसमावेशक पर्यटन या विषयावरील तंत्रामार्फत सामाजिक उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. सदरील उपक्रम शाश्वत ग्रामीण आर्थिक विकासाला चालना देऊन पर्यटन प्रोत्साहन तसेच क्षमता निर्माण करून देशाचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यावर भर देतो.

अमूर्त सांस्कृतिक वारसा आणि सांस्कृतिक वारसा पर्यटन

अमूर्त सांस्कृतिक वारसा (ICH) मध्येपिढ्यानपिढ्या समाजाची ओळख प्रतिबिंबित करणाऱ्या चालू परंपरा, प्रथा आणि ज्ञान या समाविष्ट आहेत. UNESCO च्या व्याख्येनुसार, ICH मध्ये मौखिक परंपरा, परफॉर्मिंग आर्टस्, सण, विधी, खेळ, हस्तकला,
निसर्ग आणि जागतिक पारंपारिक ज्ञान यांचा समावेश होतो. सांस्कृतिक वारसा पर्यटन पर्यटकांना स्थानिक सण, परफॉर्मिंग आर्टस्, कारागिरी आणि पाककला यासारख्या परंपरांमध्ये सहभागी होण्यासाठी आकर्षित करुन सखोल अनुभव देते. सदर उपक्रम समुदाय आधारित सांस्कृतिक पर्यटन विकसित करून ग्रामीण आणि स्थानिक समुदायांसाठी उपजीविका वाढवेल.

अमूर्त सांस्कृतिक वारसा आधारित पर्यटन विकसित करणे



सदरील उपक्रम हा महाराष्ट्रातील पालघर आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक वारसा पर्यटन विकसित करल आणि पर्यटनाच्या माध्यमातून १००० अधिक पारंपारिक अभ्यासकांसाठी उत्पन्नाच्या संधी वाढवेल. पायाभूत अभ्यासात ११००+ वारली चित्रकार, मुखवटे निर्माते, बांबू टोपली बनवणार, लोकनर्तक (उदा. तारपा, कांबडे, ठाकर, संबळ, होडी, पावरी इ.), संगीतकार, वाद्य निर्माते यांचे आकलन केलेले आहे. पालघर जिल्ह्यातील बापूगाव, गंजाड, तलासरी, जव्हार, घोलवड आणि नाशिक जिल्ह्यातील देवगाव, बर्डी-श्रीभुबन चिंचपाडा, आणि खिर्डी या परिसरातील सांस्कृतिक पर्यटन कार्यक्रम आणि स्थळे विकसित करणे हा यामागचा उद्देश आहे. लाभार्थ्ययांमध्ये वारली, कोकणा, कोकणी, मल्हार कोळी, महादेव कोळी इत्यादी समुदायांचा समावेश असेल.

कार्यक्षेत्र

- पालघर येथील कल्चर टुरिझम कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत 335 कलाकारांचा सहभाग नोंदविण्यात आला. यामध्ये स्थानिक हस्ते कौशल्ये, पारंपरिक सांस्कृतिक वर आधारित उत्पादने, त्याच प्रमाणे पर्यटन ऑफर विकसित करण्यासाठी ६० कलाकारांसाठी कार्यशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. पालघर येथे पर्यटन विकास करण्यासाठी ७८ कलाकारांची क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.
- जिवंत सांस्कृतिक वारसाच्या जतन व संवर्धन तसेच प्रचार व प्रसारासाठी डिजिटल साधने, प्रकाशने तयार करून कागदपत्रे केंद्रीत केली आहेत. सांस्कृतिक पर्यटनावर आधारित ऑडिओ क्लिप, व्हिज्युअल चित्रपट विकसित केले आहेत.फ्रेंच चित्रपट निर्माते विन्सेंट मून यांनी पालघर महोत्सवाचे सचित्र वृत्तांकन केले आहे.सोशल मीडिया

मध्येआयसीएच आधारित अनुभवात्मक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाते आहे. स्थानिक खाद्यपदार्थ पाककृतींचे प्रदर्शन करुन याचे संपूर्ण दस्त ऐवजीकरण केले आहे.

- स्थानिक भागातील १४ शाळांमध्ये सांस्कृतिक वारसाचे जतन व संवर्धन करून जनजागृती सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.ज्यामुळे तरुण पिढीला हि संस्कृती शिकण्यास प्रोत्साहन तसेच मदत होत आहे.
- सांस्कृतिक समुदायाच्या नेतृत्वाखालील महोत्सवांद्वारे ग्रामीण वारसा,अनुभवात्मक ग्रामीण व सांस्कृतिक पर्यटनाला चालना दिली जात आहे.पहिला महोत्सव २८ फेब्रुवारी ते २ मार्च २०२५ रोजी पालघर येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये पालघर जिल्ह्यातील बापुगाव,गंजड आणि घोलवड या ३ विस्तृत ठिकाणी २३ गावांमधील ६५० पेक्षा जास्त स्थानिक कलाकारांचा समावेश होता. या महोत्सवात ४२५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा व १० शैक्षणिक संस्थांचा सहभाग नोंदविण्यात आला. या महोत्सवात २०,००० हून अधिक नागरिकांनी सहभागी घेतला.